अजित फाऊंडेशन

# वार्षिक अहवाल

## २०२१-२०२२

**वंचित मुलांसाठी दर्जेदार शिक्षण.**




**अजित फाऊंडेशन**

'स्नेहग्राम', मु. पो. कोरफळे, पानगांव रोड, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन-४१३४०१ (महाराष्ट्र)

: +91 - 9096812860 / 9822897382 | : srujanonline@gmail.com | : www.snehgram.in

www.facebook.com/snehgram @SNEHGRAM12 sneh_gram

# नोंदणी तपशील

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नांव | **अजित फाऊंडेशन** |
| २ | नोंदणी क्रमांक | **एफ/१८१८०/सोलापूर** |
| ३ | कर सवलत नोंदणी क्रमांक (८० जी) | AABTC2321BF20211 |
| ४ | कर सवलत नोंदणी क्रमांक (१२ ए) | AABTC2321BE 20213 |
| ५ | पॅन नंबर | AABTC2321B |
| ६ | टॅन नंबर | PNEA19830G |
| ७ | एनजीओ दर्पण क्रमांक | MH/2011/0046576 |
| ८ | सीएसआर नोंदणी क्रमांक | CSR00020691 |
| ९ | शाळा नोंदणी क्रमांक | 17708 School No.1590 Date: 08/08/2016 |
| १० | व्यवसायिक कर नोंदणी क्रमांक | 27541691816 |
| ११ | भविष्य निर्वाह निधी क्रमांक | PUSLP2556267000 |
| १२ | कर्मचारी राज्य विमा क्रमांक | 33000941330001301 |
| १३ | फुड परवाना नोंदणी क्रमांक | 11522041000072 |

## - देणगीदारांसाठी आवश्यक माहिती -

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | **ICICI Bank Ltd** | **Union Bank of India** |
| शाखा | **औसा रोड, लातूर** | **शिवाजी नगर, बार्शी** |
| खाते क्रमांक | 034101001838 | 378302010553114 |
| आईएफएससी कोड | ICIC0000341 | UBIN0537837 |
| एमआयसीआर कोड | 413229052 | 413026201 |

**संपर्क -**

**विनया निंबाळकर**
**मो. 9096812860**

**महेश निंबाळकर**
**मो. 9822897382**

# प्रस्तावना



अजित फाऊंडेशन या संस्थेचा हा १५ वा वार्षिक अहवाल आहे. स्थलांतरीत मुलांचे शिक्षण ते निवासी शाळा हा प्रवास आता पंधरा वर्षांपर्यंत येऊन पोहचला आहे. पालातील, झोपडपट्टीतील मुले शाळेत जाऊ शकत नसतील तर शाळा झोपडपट्टीपर्यंत पोहचली पाहिजे. या उद्देशातून अजित फाऊंडेशनने बार्शीतील रस्त्यालगतच्या पालांत, झोपडपट्टीमध्ये मुलांसाठी स्लम स्कूल, साकव शाळा, सोलर नाईट स्कूल, लाईट लायब्ररी असे उपक्रम सुरू केले. जी मुले सहसा रस्त्याच्या कडेला भीक मागतात, बालमजूरी करतात अशी मुलं शिक्षणाच्या प्रवाहात यावीत यासाठी अजित फाऊंडेशनचे शिक्षक नियमितपणे झोपडपट्टीत जाऊन मुलांना शिकवतात. आजपर्यंत या भागातील २५० हून अधिक स्थलांतरीत मुलांना नियमित शाळेत प्रवेशित केले. १० विद्यार्थिनी इयत्ता १० वी व ८ विद्यार्थी इयत्ता १२ वी उत्तीर्ण झाले आहेत.

बार्शी, सोलापूर, पुणे या शहरातील २२०० हुन अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देऊ शकलो. याचबरोबर झोपडपट्टी शाळा ते स्नेहग्राम शाळा या प्रवासात ४० विद्यार्थ्यांना निवासी शिक्षण देत आहोत. एकूण पाच विषयांच्या अनुषंगाने हा अहवाल आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक जबाबदारी, पाणी, संस्था व महिला सक्षमीकरण या विषयांच्या यामध्ये अंतर्भाव आहे.

विविध गावातील कार्यकर्ते व शिक्षक यांच्या सहकार्यातून संस्थेची कामे उभी केली आहेत. यामध्ये लोकसहभाग हे आपले वैशिष्ट्य आहे. संस्थेची सर्व कामे लोकाश्रयावर आधारित आहेत. देणगीदारांच्या मदतीमुळे संस्थेची विविध कार्ये पार पडत आहेत. आपण आमच्या सादेला प्रतिसाद दिल्यानेच आमची स्वप्ने साकारत आहेत. आपण जसे प्रवासाला पुढे पुढे जातो, तशी नवीन क्षितीजे दिसू लागतात.

अजित फाऊंडेशनचा प्रवासही अगदी तसाच आहे. प्रकल्पातील मुलांबरोबर विविध उपक्रम, कृती, प्रयोग राबवत असल्यामुळे रोजच काहीतरी नवीन अनुभुती मिळते. समाज माध्यमातून जसे फेसबुक, व्हॉटस्‌ॲप, वेबसाईटस्, लिंक्डइन यातून ते समाजापर्यंत अर्थातच आपल्यापर्यंत पोहचते.

मला खात्री आहे, अहवाल वाचून संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांना प्रत्यक्ष भेट दिल्याचे काहीसे तुम्हाला वाटेल, त्यातून प्रत्यक्ष भेटीचाही योग येईल. आपल्यासारख्या सहृदयांच्या नैतिक पाठबळावर; सदिच्छांच्या शिदोरीवर १५ वर्षांचा कालखंड संपला; भविष्यही त्यावर निर्भर!

आपली विश्वासू,
**विनया महेश निंबाळकर**
सचिव, अजित फाऊंडेशन, बार्शी

# शिक्षण

**स्लम स्कूल :**

बार्शी शहरातील लातूर रोड परिसरातील डवरी गोसावी, शिकलकर, पाथरवट, बावरी या समाजातील मुले शालाबाह्य होती. यातील बरीच मुले बालकामगार, रस्त्यावर भीक मागत उदरनिर्वाह करत होती. अशा वंचित मुलांना अक्षरज्ञान व अंकज्ञान ओळख व्हावी यासाठी **'स्लम स्कूल'** हा उपक्रम सुरु करण्यात आला. या शाळेत ११० मुले प्रवेशित असून अजित फाऊंडेशनचे शिक्षक नियमितपणे ज्ञानदान करतात. अशा मुलांसाठी संस्थेने स्वतंत्र अभ्यासक्रम तयार केला आहे.





**साकव शाळा :**

कोरोना काळात पालांमधील मुलांचे शिक्षण झाले नाही, अशा मुलांना ऑनलाईन वर्ग किंवा भ्रमणध्वनी उपलब्ध न झाल्याने बरीच मुले अभ्यासात मागे राहिली. या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संस्थेच्या वतीने **'साकव शाळा'** हा उपक्रम सुरु करण्यात आला. या शाळेत पारधी समाजातील १२० विद्यार्थी प्रवेशित आहेत. या शाळेवर दोन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या मुलांना पाटी, पेन्सील, वह्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन दिले आहे.

**सृजन शाळा :**

कोरोना काळात अभ्यासात मागे राहिलेल्या कोरफळे, ता. बार्शी, जि. सोलापूर या गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी **'सृजन शाळा'** हा शैक्षणिक उपक्रम सुरू केला. या उपक्रमात ७५ मुले सामील झाली आहेत. यासाठी तीन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, दोन शिक्षक स्वयंसेवक म्हणून काम करत आहेत. या उपक्रमात पालक व विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला. कोरोना काळातील दिड वर्षांचा गॅप भरुन काढण्यासाठी हसत खेळत शिक्षण पध्दतीचा अवलंब केला.





**सोलर नाईट स्कूल :**

अजित फाऊंडेशनने बालकामगार व झोपडपट्टीतील वंचित मुलांसाठी **'सोलर नाईट स्कूल'** ही अनौपचारिक शाळा सुरू केली. बार्शीतील स्थलांतरीत वस्तीतील वंचित दुर्लक्षित मुले या शाळेत प्रवेशित असून त्यांच्या निरक्षर पालकांनाही या शाळेत सामील करुन घेतले आहे. या उपक्रमात १३० लाभार्थी आहेत. या उपक्रमातून मुलांना व त्यांच्या निरक्षर पालकांना अक्षर व अंक ओळख करुन दिली जाते. संध्याकाळी मुले व पालक यांच्या सोयीच्या वेळेनुसार ६ ते ८ या वेळेत शैक्षणिक ज्ञान दिले जाते.

## शिक्षण

**विचारांची प्रयोगशाळा :**

स्नेहग्राम प्रकल्पामध्ये 'चलो थिंक करें' या संस्थेमार्फत **'फिलॉसॉफी फॉर चिल्ड्रेन'** हा उपक्रम ऑनलाईन सुरू करण्यात आला. एखादी गोष्ट, कृती, कविता, चित्र, व्हिडिओ किंवा जीवनप्रसंग सांगून त्यावर विविध प्रश्न विचारुन मुलांसोबत चर्चा करणे व मुलांची विचार प्रक्रिया सदृढ करणे हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट्य आहे. हे ऑनलाईन सत्र पद्मनाभ केळकर, गौरवी संके व सावणी लाड यांनी घेतले तर अक्षय भास्करवार व संजय देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात ४० मुले सहभागी झाली.






**स्नेहग्राम विद्यालय व उपक्रम :** स्नेहग्राममध्ये मुलांना शिक्षणाबरोबर व्यावहारिक अनुभव मिळावे या दृष्टीकोनातून विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यात प्रत्यक्ष खरेदीचा अनुभव, विद्यार्थी बचत बँक, बालसंसद, बाल न्यायालय, एक दिवस समाज कार्यासाठी, क्षेत्रभेटी, जमाखर्चाचे व्यवस्थापन, फूड मॅनेजमेंट, व्हर्च्युअल क्लास, व्हीआर लायब्ररी, टॅबस् स्कूल असे विविधांगी उपक्रम राबविले जातात. स्नेहग्राम ही लोकशाही शाळा असल्यामुळे 'आम्हीच आमच्यासाठी' हा विचार मुलांनी प्रत्यक्षात रुजवला आहे. या शाळेत विविध पार्श्वभूमी लाभलेली वंचित, अनाथ व कोविडमुळे पालक गमावलेली ४० मुले प्रवेशित आहेत.

**प्रिसिजन होम :**

प्रिसिजन कॅमशाफ्टस् कंपनीच्या वतीने स्नेहग्राम येथे दोन वर्ग खोल्यांचा बांधकाम शुभारंभ करण्यात आला आहे. सद्यस्थितीत १ हजार २० स्केअर फुटाचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी प्रिसिजन कंपनीने अर्थसहाय्य केले आहे. या कामाच्या शुभारंभ प्रसंगी प्रिसिजन फाऊंडेशनचे चेअरमन मा. सुहासिनीताई शहा व जनसंपर्क अधिकारी माधवदादा देशपांडे उपस्थित होते. स्नेहग्रामच्या बांधकामासाठी प्रिसिजन उद्योग समूहाने सीएसआर अंतर्गत १५ लक्ष निधी दिला.





**बॉर्डरलेस स्कूल :**

स्नेहग्रामच्या मुलांना परदेशी शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधता यावा त्याचबरोबर तेथील शिक्षण पध्दती, विचार, संस्कृती, सण यांची ओळख व्हावी या दृष्टीने संस्थेने 'बॉर्डरलेस स्कूल' उपक्रम सुरू केला. या उपक्रमात व्हिएतनाम, जपान, अमेरिका, लंडन येथील शिक्षक मुलांशी संवाद साधतात. त्याचबरोबर इंग्रजी भाषेचे ज्ञान देतात. स्नेहग्रामच्या ७०% मुलांना इंग्रजी संवाद समजतो. भविष्यात जगातील सृजनशील शिक्षकांशी मुलांना जोडण्याचा बॉर्डरलेस स्कूलचा उद्देश आहे. स्नेहग्रामबरोबर स्थलांतरीत वस्तीवरील मुलांशीही परदेशी शिक्षक संवाद साधतात. या उपक्रमात १५० विद्यार्थी सहभागी आहेत.

## आरोग्य

**प्रोटिन क्लब :**

बार्शीतील स्थलांतरीत वस्तीतील डवरी गोसावी व राजस्थानच्या मूर्तीकारांच्या मुलांना पोषण आहार मिळावा या उद्देशातून **'प्रोटिन क्लब'** हा उपक्रम सुरु करण्यात आला. हा उपक्रम लोकसहभागातून चालविण्यात येतो. स्थलांतरीत वस्तीतील मुले कुपोषित, ॲनिमियासारख्या आजाराने ग्रस्त असल्याचे सर्व्हेअंती लक्षात आले. त्यानुसार अशा मुलांसाठी पोषण आहार म्हणून फळे, राजगिरा लाडू, खजूर, शेंगदाणा लाडू यांचे नियमित वाटप करण्यात येते. प्रोटिन क्लबचा सुमारे २१० मुले लाभ घेतात.





**चॅरिटी केअर :**

अजित फाऊंडेशनच्या चॅरिटी केअर अंतर्गत जाफराबाद (जि. जालना) व सध्या बार्शी येथे पालात वास्तव्यास असलेले राजू वाघमारे अपघाताने उजव्या पायाचे हाड मोडल्याचे त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया झाली होती. अजित फाऊंडेशनच्या चॅरिटी केअर अंतर्गत राजू वाघमारे यांना चालण्याचा सराव करण्यासाठी वॉकर उपलब्ध करुन दिला. यासाठी कुर्डूवाडी येथील बालाजी लुक्कड यांनी सहकार्य केले.

**चॅरिटी केअर :**

कोरफळे गावातील ओंकार धावारे हा युवक संधीवातामुळे अंथरुणात खिळून होता. त्याला नऊ वर्षाची छोटी बहिण, व्यसनाधिन वडील व आईचे निधन झाल्यामुळे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाले. त्याच्यावर पुढील उपचार करण्यासाठी चॅरिटी केअर अंतर्गत सुश्रुत हॉस्पिटल, बार्शी येथे नेण्यात आले. त्याच्यावर डॉ. संजय अंधारे व फिजिओथेरपिस्ट डॉ. करगल यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत.





**कम्युनिटी हेल्थ प्रोग्रॅम :**

भटक्या समाजातील व स्थलांतरीत वस्तीतील मुले, महिला व वृध्द यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते. यामध्ये दंत तपासणी, हिमोग्लोबिन यासह विविध तपासण्या व उपचार 'कम्युनिटी हेल्थ प्रोग्रॅम' अंतर्गत केले जातात. बार्शीतील तीन ठिकाणी हा उपक्रम राबवला जातो. या उपक्रमासाठी लायन्स क्लब, डॉ. गणेश जाधव यांनी सहकार्य केले.

## सामाजिक जबाबदारी



**ब्लँकेट वाटप :**

बार्शीतील लातूर रोड परिसरातील डवरीगोसावी वस्ती, शिकलकर व बावरी समाजातील कुटुंबांना ब्लँकेटचे वाटप करुन उबदार भेट देण्यात आली. त्यात लहान मुले, वृध्द व्यक्ती व महिलांचा समावेश होता. या उपक्रमासाठी नितीन पाटील पुणे यांनी सहकार्य केले. या वर्षी स्थलांतरीत वस्तीत सुमारे एक हजार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.



**कोविड काळात किराणा साहित्याचे वाटप :**

अजित फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक जबाबदारीतून भूम, परंडा, बार्शी, कोरफळे या ठिकाणी कोविड काळात किराणा-धान्याचे किट बनवून मोफत वाटप करण्यात आले. यात सुमारे १५०० ते २००० गरीब व वंचित लाभार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील संवेदनशील देणगीदारांनी अर्थसहाय्य केले.




**शांततेसाठी आवाहन :**

जगात युक्रेन व रशिया या दोन देशात युध्द सुरू आहे. या युध्दामध्ये अनेक नागरिक मृत्यू पावले आहेत. युध्दामुळे होणाऱ्या जागतिक नुकसानीचा विचार मुलांसमोर मांडला. त्यावेळी मुलांनी युध्द थांबवलं पाहिजे याचे संदेश देणारे बॅनर तयार करुन, जगास सोशल मीडियाच्या माध्यमातून शांततेचे आवाहन केले.



**एक दिवस समाज कार्यासाठी :**

स्नेहग्राममध्ये दाखल झालेली मुले विविध पार्श्वभूमी लाभलेली आहेत. या मुलांमध्ये सामाजिक जाणीवा निर्माण व्हाव्या या उद्देशातून मोठ्या वयोगटातील मुलांना रोटेशन पध्दतीने बार्शीतील स्थलांतरीत वस्ती, झोपडपट्टी भागात मदत कार्यात सामील करुन घेण्यात येते. ज्यामुळे मुलांमध्ये समाजकारणाची बीजे रुजवता येतील. एक दिवस समाज कार्यासाठी या उपक्रमात स्नेहग्रामच्या अनेक मुलांनी सहभाग नोंदविला.

## संस्था सक्षमीकरण

**श्री विठ्ठल शाळेस संगणक भेट :**

श्रमर्षी बाबा आमटे यांच्या पुण्यतिथी निमित्त सामाजिक संस्था सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत कव्हे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील श्री विठ्ठल ज्ञानमंदिर शाळेतील मुलांना डिजीटल शिक्षणासाठी संगणक भेट दिला. या उपक्रमासाठी सृजनालय फाऊंडेशनने अर्थसहाय्य केले.






**महिला प्रशिक्षण केंद्रास शिलाई मशीन भेट :**

सोलापूर शहरातील सारथी कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील कामगार महिलांना प्रशिक्षणासाठी संस्थेच्या वतीने शिलाई मशीन देण्यात आली. सारथी केंद्रातील महिलांना शिलाई मशीनची गरज लक्षात घेऊन अजित फाऊंडेशनने कोकण या कपंनीची शिलाई मशीन दिली. यासाठी सृजनालय फाऊंडेशन या संस्थेने अर्थसहाय्य केले.

**ज्ञानपीठ वाचनालयास पुस्तक भेट :**

बार्शी स्थित ज्ञानज्योत फाऊंडेशनच्या ज्ञानज्योत वाचनालयास सुमारे २० हजार किंमतीची पुस्तके देण्यात आली. या वाचनालयात महाविद्यालयीन तरुण आपल्या ज्ञानवृध्दीसाठी या पुस्तकांचा लाभ घेणार आहेत. या उपक्रमासाठी अजित फाऊंडेशनने वस्तुरूप मदत दिली.



## पाणी



**क्लीन वॉटर प्रोजेक्ट :**

बार्शी तालुक्यातील गाडेगाव येथील ग्रामस्थांसाठी २५० लिटर क्षमतेचा सौ. अनुश्रीताई आनंद भिडे जलशुध्दीकरण प्लान्ट बसवण्यात आला. यासाठी स्वराज्य प्रतिष्ठान व स्नेहग्राम यांनी पुढाकार घेतला. स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने ४० टक्के लोकसहभाग तर ठाणे येथील निवृत्त बँक अधिकारी सौ. अनुश्रीताई भिडे यांनी स्नेहग्रामच्या वतीने ६० टक्के सहभाग रक्कम दिली. या प्लान्टचे लोकार्पण स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष संजय गुगळे व प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## मान्यवरांच्या भेटी

**सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांची भेट :**

चित्रपटसृष्टीतील सुप्रसिध्द सिनेअभिनेते व वृक्षमित्र सयाजी शिंदे सर यांची भेट घेऊन संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी संस्थेचे माहितीपत्रक व लोगोचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी सचिन चांदणे, महेश निंबाळकर, विनया निंबाळकर उपस्थित होते. यावेळी सयाजी शिंदे यांनी संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.





**जि. प. सोलापूर चे सीईओ दिलीप स्वामी यांची भेट :**

सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ दिलीप स्वामी सर यांनी स्नेहग्राम व ज्ञानज्योत फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सृजन टॉक्स् या कार्यक्रमात महाविद्यालयीन तरुणाईशी संवाद साधला. या कार्यक्रमास मा. प्रदिपकुमार आग्रे (सहाय्यक कर आयुक्त जीएसटी, मुंबई) व मा. शेखर सावंत सर (गटविकास अधिकारी, बार्शी) उपस्थित होते. तसेच कोरफळे गावातील तरुण, ज्ञानज्योतचे स्वयंसेवक व महाविद्यालयीन तरुण सामील झाले होते.

**पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांची भेट :**

करमाळा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे साहेब यांनी स्नेहग्रामला भेट दिली. त्यांनी येथील मुलांशी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा केली.






**भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ग्रंथालय :**

परिवर्तनाच्या वाटा समूहाच्या वतीने स्नेहग्राम मध्ये भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ग्रंथालय खोलीचे लोकार्पण माजी शिक्षण संचालक श्री. गोविंद नांदेडे सर व पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील विविध भागातील असंख्य शिक्षक उपस्थित होते. या ग्रंथालयास शिक्षक, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी यांनी पुस्तके उपलब्ध करुन दिली. परिवर्तनाच्या वाटा समूहाचे श्री. भरत काळे सर व परिवर्तन वाटा टीमने सहकार्य केले.

## पुरस्कार

**सॉफ्टटेक केअर फाऊंडेशनकडून सन्मान :**

महिला दिनाचे औचित्य साधून पुणे येथील सॉफ्टटेक केअर कंपनीच्या वतीने स्नेहग्रामच्या विनया निंबाळकर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी कंपनीचे संचालक व महिला कर्मचारी यांना स्नेहग्रामचे कार्य व उपक्रमांची माहिती दिली.





**रोटरी क्लब ऑफ नॉर्थकडून सन्मान :**

सोलापूर शहरातील रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ या संस्थेचा पुरस्कार स्नेहग्रामला मिळाला. त्यावेळी बालाजी अमाईन्स लि. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक मा. राम रेड्डी सर यांच्या हस्ते विनया निंबाळकर यांनी पुरस्कार स्विकारला.

## आपली छोटीसी मदत, निर्मिल प्रेरक आयुष्ये....!

स्नेहग्राममध्ये सध्या ४० विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्या सहयोगाची आवश्यकता आहे. आपण आर्थिक, अन्नधान्य, वस्तू, शैक्षणिक साहित्य सहयोगातून संस्थेस मदत करु शकता. तसेच स्थलांतरीत वस्तीतील, अनाथ व निराधार मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी आपला सहयोग निधी त्यांचे भविष्य घडविण्यासाठी उपयोगी येईल.

| अ.क्र. | सेवा सहयोग तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १) | स्कूल कीट | ५००/- |
| २) | एकवेळचे जेवण | १५००/- |
| ३) | एक दिवसाचे भोजन | ३०००/- |
| ४) | औषधोपचार | २०००/- |
| ५) | पोषण आहार | २५००/- |
| ६) | शैक्षणिक योगदान | ₹ ६०००/- |
| ७) | एका मुलाचे मासिक पालकत्व | ₹ २२५०/- |
| ८) | एका मुलाचे वार्षिक पालकत्व | ₹ २६८००/- |

अजित फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने मुलांचा निवासी प्रकल्प सध्या पत्राशेडमध्ये असून तो पक्क्या इमारतीत विस्तारण्याचा संस्थेचा मानस आहे. त्या अंतर्गत सध्या प्रिसिजनच्या वतीने दोन खोल्यांचे बांधकाम पूर्णत्वाकडे जात आहे. मुलांची संख्या व कर्मचारी निवासाची गरज लक्षात घेता आणखी १० वर्गखोल्या व मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृह आणि निवासी कर्मचाऱ्यांसाठी ५ खोल्यांची नितांत गरज आहे. तेव्हा देणगी दात्यांनी संस्थेला आपल्या कौटुंबिक आनंददायी प्रसंगी, प्रियजनांच्या स्मृतीप्रित्यर्थ बांधकामासाठी आर्थिक सहयोग त्याचबरोबर सिमेंट गोण्या, वीट, पत्रे, अँगल, दारे, खिडक्या, टाईल्स फरशा, डबर, पाईप, मोटार, लाईट साहित्य व उपयोगी बांधकाम साहित्याची मदत करु शकता.

आपल्या प्रियजनांची स्मृती स्नेहग्राममध्ये जपली जाईल. आपण बांधकाम निधी 'अजित फाऊंडेशन' (Ajit Foundation) या नावाने खालील बँक खातेत जमा करु शकता.

| Bank Name | ICICI Bank Ltd | Union Bank of India |
|---|---|---|
| Branch Name | Ausa Road, Latur | Barshi |
| Account No. | 034101001838 | 378302010553114 |
| IFSC No. | ICIC0000341 | UBIN0537837 |
| MICR Code. | 413229052 | 413026201 |

**आपण दिलेली देणगी आयकर अधिनियम १९६१ च्या ८०G नुसार करमुक्त आहे. सदरहू देणगी मानव कल्याणार्थ वापरली जाते.**



बार्शी : जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण करताना संजय गुगळे, माधव देशपांडे व इतर.

# गाडेगावात 'जलशुद्धीकरण'चे लोकार्पण

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

गाडेगाव (ता. बार्शी) येथे स्नेहग्राम व स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या वतीने लोकवर्गणीतून उभारलेल्या अनुश्री आनंद भिडे जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष संजय गुगळे व प्रिसिजन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी स्नेहालय संस्थेचे वरिष्ठ संचालक अनिल गावडे होते. यावेळी संजय गुगळे व माधव देशपांडे यांनी शुद्ध पाण्याचे आरोग्याच्यादृष्टीने असलेले महत्त्व सांगितले. तसेच, सपोनि शिवाजी जायपत्रे यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक राहुल भालके यांनी केले. यावेळी उद्योजक प्रशांत पैकेकर, संतोष सूर्यवंशी, गणेश गोडसे, उपसरपंच धोंडीराम नागणे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

सुमारे १ लाख १५ हजार किमतीचा २५० लिटरचा कॉईन व प्रीपेड रिचार्ज बेस आरओ बसवून त्याचे लोकार्पण करण्यात आले. अनुश्री भिडे यांनी स्नेहग्रामच्यावतीने ६० टक्के रक्कम दिली. गणेश नागणे, गजानन बोराडे, प्रमोद जाधव यांनी परिश्रम घेतले.



बार्शी : ज्ञानज्योत विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन शिबिराप्रसंगी विनया निंबाळकर, अमोल अडाणे आदी.

# पालकांकडून फायदा घ्या, गैरफायदा नको : निंबाळकर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थिनींनी त्यांना सद्य:परिस्थितीत पालकांकडून त्यांना मिळणाऱ्या सुविधांचा फायदा घ्यावा; पण गैरफायदा घेऊ नये, असे प्रतिपादन विनया महेश निंबाळकर यांनी केले. त्या बार्शीत ज्ञानज्योतच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित मार्गदर्शन शिबिर कार्यक्रमप्रसंगी बोलत होत्या.

यावेळी ज्ञानज्योत फाऊंडेशनचे अध्यक्ष अमोल अडाणे, अरबाज शेख, महेश सुतार उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील विकास व्हावा, या दृष्टिकोनातून ज्ञानजोत फाउंडेशनने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विनया निंबाळकर यांनी विद्यार्थिनींशी मार्गदर्शनपर संवाद साधला.तसेच त्यांनी सामाजिक कार्य करत असताना आणि स्नेहग्राम ही वंचितांची शाळा हा सामाजिक उपक्रम राबवित असताना कसा संघर्ष केला हे सांगितले. तसेच विद्यार्थिनींनी त्यांना चांगल्या निर्णयावर ठाम राहायला शिका तसेच आयुष्य जगत असताना स्वत:साठी जगता जगता समाजासाठी ही जगून पाहावे असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी निशा हिंगमिरे, तर आभार अमोल अडाणे यांनी मानले.



# वादळाशी संसार; जीवनात ज्ञानज्योती

**विनया निंबाळकर**

**विनया निंबाळकर यांचे पती महेश निंबाळकर हे सोलापूर जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत. विनया यांचेही शिक्षण डीएडपर्यंत झालेले. त्यांनाही जळगाव जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरीचा कॉल. त्याच वेळी शिक्षणापासून वंचित असणाऱ्या भटक्या समाज घटकातील मुलांसाठी शाळा काढण्याचे, त्या समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्याचा मानस महेश निंबाळकर यांच्या डोक्यात येतो. त्यावेळी मित्रपरिवार, कुटुंबीय यांचा विरोध झुगारून महेश निंबाळकर प्राथमिक शिक्षक पदाची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला.**

मुलांना शिकविण्यासाठी शिक्षकाची गरज ओळखून विनया निंबाळकर यांनाही जळगाव येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरीस रुजु न होण्याचा आग्रह धरतात. पतीच्या कर्तृत्वावर नितांत श्रध्दा व विश्वास असणाऱ्या विनया निंबाळकर ह्या कुटुंबीय, समाज, मित्रपरिवार यांचा विरोध झुगारुन पती महेश निंबाळकर यांच्या पाठीशी उभ्या राहतात. हा कोणताही हिंदी चित्रपटातील कल्पनाप्रधान प्रसंग नसून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील कोरफळे येथे सध्या वास्तवास असणाऱ्या, वादळाची संसार करणाऱ्या विनया निंबाळकर यांच्या जीवनात घडलेली वास्तवातील घटना आहे.

पती-पत्नी शासकीय नोकरी सोडून बार्शी तालुक्यातील कोरफळे येथे भटक्या समाजासाठी हक्काची शाळा सुरू केली आहे. पतीच्या या सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देत विनया निंबाळकर यांनी जणू वादळाशी संसार केला. शिक्षणापासून दूर असणाऱ्या समाज घटकातील विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानज्योती प्रज्वलित करण्याचे काम या पती-पत्नीने केले

**शरीफ सय्यद**

आहे. त्यामुळे वादळात दिवा लावणे हे दिव्य कर्तृत्व पार पाडताना निंबाळकर पती-पत्नींना कुटुंब, समाज व मित्र परिवाराकडून त्यावेळी हेटाळणी स्वीकारावी लागली. मात्र, आता त्याच लोकांकडून आज 'स्नेहग्राम'साठी मदतीचे हात पुढे येत आहेत.

आधुनिक युगात भौतिक सुखांची सर्वांनाच ओढ असते. मात्र पतीच्या सामाजिक कार्यात सहभागी होऊन भौतिक सुखांना तिलांजली देत भटक्या व शिक्षणापासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अजित फाऊंडेशनच्या माध्यमातून बार्शी तालुक्यातील कोरफळे येथे 'स्नेहग्राम'ची उभारणी केली. निंबाळकर दांम्पत्यांच्या त्यागातून उभारलेल्या या संस्थेत सध्या चाळीसच्यावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे पालक नव्हे तर आई-वडील होण्यात निंबाळकर दांपत्य धन्य-धन्य झाले आहेत. कोरफळेची ओळख आज स्नेहग्राम चे कोरफळे अशी झाली आहे.

◆◆◆

# वंचितांच्या 'स्नेहग्राम'मध्ये अवतरणार शिक्षणाची गंगा

## प्रिसिजन समूहाच्या सीएसआर फंडातून साकारणार निवासी शाळा

**सोलापूर / प्रतिनिधी**

बार्शी तालुक्यातील कोरफळे येथील अजित फाउंडेशन संचलित स्नेहग्राम या प्रकल्पात 'प्रिसिजन' समूहाच्या पुढाकारातून निवासी शाळेची निर्मिती केली जात आहे. या प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभ प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ४ मार्च) पार पडला.

विनया आणि महेश निंबाळकर या दांपत्याच्या वतीने भटक्या, वंचित मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्नेहग्राम हा निवासी प्रकल्प चालविला जातो. निंबाळकर दांपत्याचे हे कार्य २००७ सालापासून सुरू आहे. विशेष म्हणजे यासाठी त्यांनी आपल्या सरकारी शिक्षकी पेशाचाही त्याग केला आहे.



भीक मागणारी, शाळाबाह्य, अनाथ, लैंगिक शोषण झालेली, कैद्यांची मुले निंबाळकर दांपत्याने पालावर स्वतः फिरून गोळा केली. त्यांना शिक्षणाची गोडी लावली. मात्र पूर्णवेळ निवासी प्रकल्प उभा केल्याखेरीज अपेक्षित उद्दिष्ट साध्य होणार नाही हे ओळखून त्यांनी स्नेहग्रामची स्थापना केली. त्यातूनच भटक्यांच्या शाळेची संकल्पना पुढे आली. स्नेहग्रामच्या या कार्याची दखल आनंदवनचे प्रणेते असणाऱ्या आमटे परिवारानेही घेतली. बाबा आमटे यांचे नातू आणि डॉ. विकास आमटे यांचे चिरंजीव कौस्तुभ आमटे यांनी निंबाळकर दांपत्याला मदतीचा हात दिला. प्रिसिजन समूहाने देखील २०१८ साली प्रिसिजन गप्पांमध्ये सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देऊन स्नेहग्रामचा गौरव केला होता.

या पार्श्वभूमीवर आज या प्रकल्पात प्रिसिजन समूहाच्या सीएसआर फंडातून निवासी शाळेची वर्गखोली व शिक्षक निवास यांचा भूमीपूजन समारंभ झाला. शाळेच्या माध्यमातून आता या प्रकल्पात शिक्षणाची गंगा अवतरणार आहे.

यावेळी अहमदनगरच्या स्नेहालय संस्थेचे गिरीष कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार राजा माने, दत्ता बारगजे, दीपक नागरगोजे, विनया व महेश निंबाळकर यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्नेहग्राममध्ये सुरु झाली विचारांची प्रयोगशाळा

**संचार प्रतिनिधी**

बार्शी, दि. ८- कोरफळे येथील स्नेहग्राम प्रकल्पामध्ये 'चलो थिंक करें' या संस्थेमार्फत 'फिलॉसॉफी फॉर चिल्ड्रेन' हा उपक्रम ऑनलाइन सुरू करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील हा अभिनव प्रयोग असून येथील वंचित मुलांना याचा फायदा होणार आहे.

या प्रयोगामुळे स्नेहग्राममधील मुलांचा उत्साह आणखी वाढला आहे. एखादी गोष्ट, कृती, कविता, चित्र, व्हिडिओ किंवा जीवनप्रसंग सांगून, दाखवून त्यावर विविध प्रश्न विचारून मुलांसोबत चर्चा करणे व मुलांची विचार करण्याची प्रक्रिया सुदृढ करणे हे 'चलो थिंक करें'च्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

हा कार्यक्रम आठवड्यात २ दिवस, १-१ तास ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येतो. स्नेहग्राम संस्थेच्या विद्यार्थ्यांबरोबर हा उपक्रम गेले ६ आठवडे सुरू आहे. आजच्या बदलत्या शिक्षणव्यवस्थेत, विचार करणे, विचारांचे मूल्यमापन करणे, त्यावर योग्य निर्णय घेणे आणि घेतलेल्या निर्णयानुसार, जबाबदारी घेऊन त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे या गोष्टींचे महत्त्व खूप वाढले आहे. 'चलो थिंक करें'- 'फिलॉसॉफी फॉर चिल्ड्रेन' या पध्दतीमुळे मुले-मुली या नवीन बदलासाठी सहज तयार होतात. हे सत्र पद्मनाभ केळकर, गौरवी संखे व सावनी लाड यांनी घेतली. अक्षय भास्करवार व संजय देशपांडे यांचे या उपक्रमाला मार्गदर्शन लाभले.

स्नेहग्रामचे संस्थापक महेश व विनया निंबाळकर यांनी या उपक्रमाचा मुलांना खूप उपयोग होत असल्याचे सांगितले.

# पालावरची मुले येणार शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात

**संचार प्रतिनिधी**

बार्शी, दि. १ - शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असणाऱ्या पालावरच्या मुलांसाठी तालुक्यातील कोरफळेच्या स्नेहग्रामने पुढाकार घेऊन साकव शाळा सुरु केली आहे. पालावर जाऊन शिक्षक मुलांना शिक्षणाचे धडे देणार असल्याने ही वंचित मुले आता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येणार असल्याने या शाळेचा शुभारंभ करण्यात आला.



बार्शी : शहराच्या जामगाव रोडवर पालावर राहणाऱ्या मुलांना शिक्षणाचे महत्त्व सांगताना प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे. यावेळी महेश निंबाळकर, प्राचार्य दीपक गुंड, ॲड. प्रसन्न नाईकनवरे व अन्य.

कोरफळे येथील स्नेहग्राम प्रकल्पाचे प्रमुख महेश निंबाळकर यांनी यासाठी पुढाकार घेतला घेऊन वंचितांसाठी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. या शाळेवर दोन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालावर जाऊन हे शिक्षक मुलांना शिकवणार आहेत. नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे व प्राचार्य दीपक गुंड यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

पालावरची मुलेही शिक्षणामुळे मोठ्या पदावर जातील. पुढे शाळेत प्रवेश घेण्यासाठी या मुलांना अडचण आल्यास निश्चितपणेच प्रशासन अधिकारी म्हणून आवश्यक तिथे त्यांना मदतीचा हात देऊ, असे बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी या मुलांना पाट्या, पेन्सिल, वह्या, पुस्तके आणि पालावर राहणाऱ्या महिलांना साड्यांचे वाटप यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रा. अमोल आडाने, ॲड. प्रसन्न नाईकनवरे, धीरज भोसले, बाबा ठाकरे, दत्ता भोगे, महेश कुंभारे, अरबाज शेख, महेश सुतार, जमीर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

# करोनाकाळात अभ्यासात मागे राहिलेल्या मुलांसाठी 'सृजन शाळा'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सोलापूर :** गेल्या दीड वर्षांपासून करोनामुळे शाळा बंद होत्या, ऑनलाइन शिक्षणासाठी भ्रमणध्वनी व इंटरनेटची सोय न झाल्यामुळे ग्रामीण भागातील बरीचशी मुले अभ्यासात मागे राहिली आहेत. या मुलांसाठी बार्शी तालुक्यात कोरफळे येथे 'सृजन शाळा' खुली झाली आहे. या शाळेशी ७५ वंचित विद्यार्थी जोडले गेले आहेत.

आजित फाउंडेशन संचलित स्नेहग्राम प्रकल्पांतर्गत महेश निंबाळकर व विनया निंबाळकर या



दाम्पत्याने हा उपक्रम हाती घेतला आहे. रजनी व सुधाकर बरडे या निवृत्त शिक्षक दाम्पत्याच्या हस्ते या सृजन शाळेचा शुभारंभ झाला. या वेळी कोरफळ्याचे सरपंच बाळू शिंदे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष गौतम जगताप, महेश निंबाळकर, शंकर पाटील, रामभाऊ संसारे, रणजित माने आदी उपस्थित होते. या सृजन शाळेसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यातील अनुभवी शिक्षण तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आल्याचे विनया निंबाळकर यांनी सांगितले.

करोनामुळे जवळजवळ सर्वच क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यात शैक्षणिक क्षेत्रातील नुकसान हे भविष्यातील पिढ्यांचे नुकसान आहे. हे लक्षात घेऊन स्नेहग्रामच्या पुढाकारातून व प्रवीण घेमाड, मदन वाघमोडे, प्राजक्ता कुंभार, रोहिणी घेमाड, तेजस्वी बरडे, कोमल बरडे या शिक्षकांच्या सहयोगातून हा उपक्रम कार्यान्वित झाला. शाळेतील मुलांना धनंजय बरडे व सोनाली बरडे यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# महिला प्रशिक्षण केंद्राला स्नेहग्रामकडून शिलाई मशीन

**संचार प्रतिनिधी**

बार्शी, दि. १७- तालुक्यातील कोरफळे स्नेहग्राम (अजित फाउंडेशन) व सृजनालय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर शहरातील सारथी कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील महिला प्रशिक्षणार्थींना शिलाई मशीन भेट देण्यात आली.

सारथी युथ फाउंडेशनच्यावतीने सोलापूर एमआयडीसी भागातील कामगार वसाहतीतील कामगारांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, तंबाखूजन्य पदार्थाचे व्यसन कमी व्हावे, प्रशिक्षणातून कायमस्वरूपी रोजगार मिळावा, या हेतूने विडी कामगार, लघु कामगार, बांधकाम कामगार अशा कामगार कुटुंबातील महिलांसाठी मोफत शिलाई प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. यासाठी शिलाई प्रमाणपत्र कोर्स चालवला जातो. या केंद्रात ३० महिला प्रशिक्षणार्थी आहेत. सारथीच्या संस्थेचे युवक कार्य, तंबाखू व्यसनमुक्ती कार्य यातून सुरु झालेला पुढचा टप्पा अर्थातच कौशल्य प्रशिक्षण केंद्र आहे, असे सारथीचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी सांगितले.

सामाजिक समस्या सोडवण्यासाठी सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे काम केल्यास निश्चित सामाजिक प्रश्न लवकर सुटण्यास मदत होईल, असे स्नेहग्रामचे महेश निंबाळकर म्हणाले. अजित फाउंडेशन ही संस्था बालक्षेत्राबरोबर समुदाय सेवा



बार्शी : सोलापुरातील महिला प्रशिक्षण केंद्राला बार्शीच्या स्नेहग्रामने शिलाई मशीन भेट दिली.

व सामाजिक संस्था सक्षमीकरण कार्यक्रमाच्या माध्यमातून काम करते. २०१४ पासून लोकसहभागातून महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक, वस्तू रुपात, उपकरणांची मदत करत असून मुलींचे शिक्षण, गरजूंना हॉस्पिटलसाठी खर्च यासाठी मदत केली आहे. शिलाई मशीनसाठी सृजनालय फाउंडेशन या संस्थेने अर्थसहाय्य केले.

याप्रसंगी कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील महिला प्रशिक्षणार्थी, सारथी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रवीण शिंदे, राजेंद्र कांदलगावकर, अमोल चाबुकस्वार यांनी प्रयत्न केले.



कोरफळे : दृष्टीहीन ईश्वरी बरडे हिने वाढदिनी वंचितांच्या स्नेहग्रामला आर्थिक मदत केली.

# डिजिटल शिक्षणासाठी स्नेहग्रामकडून संगणक भेट

**संचार प्रतिनिधी**

बार्शी, दि.१३ - श्रमर्षी बाबा आमटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त व अजित फाउंडेशन (स्नेहग्राम) च्या (एम्पॉवरिंग ग्रासरुट) सामाजिक संस्था समक्षीकरण कार्यक्रमांतर्गत कव्हे येथील विठ्ठल ज्ञान मंदिर शाळेतील मुलांना डिजिटल शिक्षणासाठी संगणक भेट देण्यात आला.

सामाजिक काम करत असताना सेवाभावी संस्थांना अनेकदा प्रश्नांशी सामना करावा लागतो. यासाठी सर्वांनी हातात हात घेऊन एकमेकांना सर्वार्थाने पाठबळ देण्याच्या उद्देशाने अजित फाउंडेशनचा 'सामाजिक संस्था समक्षीकरण कार्यक्रम' कार्यरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सामाजिक संस्थांना आर्थिक, वस्तुरूप,



श्री विठ्ठल संस्थेस डिजिटल शिक्षणासाठी स्नेहग्राम संस्थेकडून संगणक भेट देण्यात आला. यावेळी महेश निंबाळकर, नारायण माने व अन्य.

बांधकाम, उपकरणांची मदत या कार्यक्रमांतर्गत केली आहे.

विठ्ठल संस्था शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून ग्रामीण भागातील मुलांसाठी श्री विठ्ठल ज्ञानमंदिर ही शाळा चालवली जाते. या प्रशालेत ११० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांना डिजिटल शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने संगणकाची आवश्यकता होती. त्यानुसार अजित फाउंडेशने एम्पॉवरिंग ग्रासरुट प्रोजेक्ट अंतर्गत पुढाकार घेत संगणकासाठी सृजनालय फाउंडेशनने अर्थसाहाय्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेखा माने तर सूत्रसंचालन आरती गोरे यांनी केले. यावेळी नीता माने, आरती गोरे, उमा मोरे, प्रांजली झाडे, नारायण माने, महेश निंबाळकर आदी उपस्थित होते.

# मुलांना जीवनशिक्षण देणारं 'स्नेहग्राम'

**» क्षण बहराचे**

पालावर जगणाऱ्या बालकांना त्यांच्या मूलभूत हक्कांपैकी सुरक्षित निवारा, पोटभर जेवण, शिक्षण व प्रेम देणारं 'स्नेहग्राम' हे समाज विकासाचं एक अनोखं प्रारूप आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यामधील कोरफळे या गावात ही निवासी शाळा आहे. संचालक महेश निंबाळकर व त्यांच्या पत्नी विनया यांनी गेल्या १४ वर्षांत विकसित केलेल्या या केंद्रात आज ४० मुलं जीवनशिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

विनयाताई म्हणाल्या, "निंबाळकर हे जिल्हा परिषदेच्या एका शाळेत शिक्षक होते. शाळेत जा-ये करताना त्यांना दोन वस्त्या दिसत. कलात्मक मूर्ती रस्त्यावर विकणारे राजपूत व मराठवाड्यातून आलेले टिकल्या, पिना, कंगवे वगैरे विकणारी ती भटकी मंडळी होती. तेथील बालकांना जवळच्या शाळेत प्रवेश मिळवून देण्याची खूप खटपट निंबाळकरांनी केली. स्वतःची नोकरी सांभाळून शनिवार-रविवार या मुलांसाठी पालावरची शाळा सुरवातीला चालवली. पण, त्या मुलांसाठी अशा तात्पुरत्या उपायापेक्षा दीर्घ पल्ल्याचं भरीव काम केलं पाहिजे, हा विचार त्यांच्या मनात दृढ होऊ लागला. यासाठी कायमस्वरूपी जागा असावी म्हणून पैशांची कशीबशी जमवाजमव करून



मुख्याध्यापिका विनया निंबाळकर यांच्याकडून शिवणकाम शिकण्यात दंग विद्यार्थी.

पाचखेतीन एकर जागा घेतली. 'आनंदवन समाजभान अभियान'तर्फे कौस्तुभ विकास आमटे यांनी निवासी शाळा उभारून दिली. अजित फाउंडेशन अंतर्गत ही शाळा चालते. कमी किमतीत जागा मिळवण्यासाठी गाववस्तीपासून बरंच लांब यावं लागलं. पण, या १४ वर्षांमध्ये मुलांनी लावलेली व जोपासलेले एक हजाराहून वृक्ष आता आमचे सगेसोयरे आहेत. अनाथ किंवा एक पालक असलेल्या वंचित मुलांना, पुस्तकी शिक्षणाबरोबरच स्वतःच्या पायांवर उभं राहण्यासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण देण्याचा ध्यास आम्ही दोघांनी घेतला. २५ मुलांपासून सुरवात झालेल्या स्नेहग्राममध्ये आता ४० मुलांचं गोकूळ आहे.

आधी मी माझी शिक्षिकेची नोकरी सोडून इथली जबाबदारी स्वीकारली. नंतर निंबाळकरांनीही नोकरी सोडून, पूर्ण वेळ व्यवस्थापनासाठी द्यायचा अवघड निर्णय घेतला. आता ते संचालक व मी मुख्याध्यापिका असले तरी दोघे मिळून या मोठ्या कुटुंबातील सदस्य आहोत. या व्यापक कुटुंबासाठी लागणाऱ्या खर्चाचं अंदाजपत्रक मुलं तयार करतात."

विनयाताईंनी असंही सांगितलं की, मुलं दिवाळी-उन्हाळी सुटीत पालकांकडे जातात. अल्पेमध्ये पालक किंवा भेटायला येणाऱ्या नातेवाइकांनी दिलेले पैसे सांभाळण्यासाठी बचत बँक केली आहे. स्लीप भरून पैसे ठेवणं-काढणं ते करतात. आपापल्या खात्यातील थोडी रक्कम काढून बाजारफेरीचा कार्यक्रम असतो. त्यात मुलांनी घासाघीस करणे, परवडणाऱ्या दरात टिकाऊ वस्तू घेणे वगैरेचा सराव होतो. आमची मुलं पुरणपोळीपर्यंत संपूर्ण स्वयंपाक उत्कृष्टपणे करतात. झाडांची निगा, आवारातील साफसफाई आदी सर्व प्रकारच्या कामांसाठी मुलांच्या समित्या आहेत. स्नेहग्रामची ग्रामसभा भरते. मुलांना निवडणुकीची प्रक्रिया समजावी व नागरिक या नात्याने आपल्या कर्तव्यांची जाण वाढावी, यासाठी पद्धतशीर निवडणूक होते. सायकलचं पंक्चर मुलं स्वतःच दुरुस्त करतात. त्यांच्यासाठी नवनव्या प्रयोगांमधून आम्हांलाही शिक्षण होतं आहे.

# महेश अन् विनया बनले वंचित मुलांचे मायबाप...

## मुलांच्या हाती दिले ज्ञानाचे पुस्तक ; पालावरच्या शाळेचा प्रवास पोहचला निवासी शाळेपर्यंत



**सोलापूर /प्रतिनिधी :**

बार्शी शहरापासून १३ किलोमीटर अंतरावर कोरफळे- पानगाव रोडवरील निर्मनुष्य अशा उजाड माळरानावर स्नेहग्राम ही संस्था वंचित मुलांसाठी कार्य करत आहे. स्थलांतरित मुलं शिक्षणाच्या प्रवाहात यावीत, यासाठी पालांतून सुरु झालेला प्रवास आता निवासी शाळेपर्यंत पोहचला आहे. वंचित व दुर्लक्षित ... यासाठी स्नेहग्राम प्रयत्नशील आहे.

सुरुवातीला बार्शीत मराठवाड्यातून, राजस्थानहून आलेली स्थलांतरीत कुटूंबातील मुलं भीक मागणं, बालमजुरी करणं, व्यसनाधिनतेच्या आहारी गेलेल्या मुलांसाठी महेश निंबाळकर यांनी सन २००७ ला भटक्यांची शाळा सुरु केली. अनौपचारिक शिक्षणाबरोबर मुलींचे आरोग्याचे प्रश्न, महिलांचे बाळंतपण, आरोग्य शिबीरं, रेशनकार्ड, आधार कार्ड, वयाचे दाखले अशा अनेक प्रश्नांवर स्नेहग्रामनं चौफेर काम सुरु केलं. मात्र कुटुंबाचं अन्यत्र स्थलांतर झालं की काम ठप्प व्हायचं, त्यामुळे मुलांना पालांतून बाहेर काढून गुणात्मक शिक्षण देण्यासाठी शाश्वत मार्ग शोधावेत, यासाठी मनात खलबत सुरु झाली. त्यात निवासी शाळेचा पर्याय पुढे आला.

खांडवीत १५ जून २०१५ रोजी निवासी शाळा सुरु झाली. परंतु वर्षभरातच स्थलांतरीत घटकांवर काम करणाऱ्या संस्थेला दुप्पट भाडेवाढीमुळे स्थलांतरीत होण्याची वेळ आली. भविष्यात अशी अडचण उद्भवू नये, या विचारातून कुटुंबातील सर्व पैसा संस्थेसाठीच्या जागेसाठी गुंतवायचा ठरवलं. त्यानंतर कोरफळे गावाच्या माळरानावर ३ एकर जागा घेतली. सौ. विनया आणि श्री. महेश निंबाळकर या दांपत्याच्या वतीने भटक्या, वंचित मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'स्नेहग्राम' हा निवासी शाळेचा प्रकल्प सुरु झाला. विशेष म्हणजे यासाठी त्यांनी आपल्या सरकारी शिक्षकी पेशाचाही त्याग केला आहे.

भीक मागणारी, शाळाबाह्य, अनाथ, लैंगिक शोषण झालेली, कैद्यांची मुले निंबाळकर दांपत्याने पालावर स्वतः फिरून गोळा केली. त्यांना शिक्षणाची गोडी लावली. मात्र पूर्णवेळ निवासी प्रकल्प उभा केल्याखेरीज अपेक्षित उद्दिष्ट साध्य होणार नाही हे ओळखून त्यांनी 'स्नेहग्राम'ची स्थापना केली. अजित फाऊंडेशन, बार्शी संचलित स्नेहग्राम विद्यालय, कोरफळे ही स्वयंअर्थसहाय्यित शाळा असून लोकाश्रीत आहे. संस्थेला शासनाकीय अनुदान मिळत नाही. स्नेहग्राम उभारणीसाठी सुरु असलेल्या प्रामाणिक धडपडीची दाखल घेत आनंदवनचे प्रणेते असणाऱ्या आमटे परिवारानेही घेतली. डॉ. विकास आमटे व श्री. कौस्तुभ आमटे यांनी निंबाळकर दांपत्याला मदतीचा हात दिला.

### स्नेहग्रामाला हवीय आधाराची गरज..!

सध्या स्नेहग्राममध्ये ५ टिनशेड पत्र्याच्या वर्गखोल्या असून मुलांना स्वतंत्र निवासाची सोय नाही. या पार्श्वभूमीवर प्रिसिजन समूहाच्या सीएसआर फंडातून निवासी शाळेची एक वर्गखोली व शिक्षक निवास यांचा भूमीपूजन नुकतेच करण्यात आहे. अजून भौतिक सुविधांची नितांत गरज आहे. यासाठी समाजातील दातृत्वसंपन्न हातांची खरी गरज आहे. तेव्हा दात्यांनी वाढदिवस, प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधकामासाठी आर्थिक किंवा वस्तुरूप मदत करण्याचे आवाहन स्नेहग्रामनं केलं आहे. आता स्नेहग्रामचा निवारा आकार घेतो आहे. आपलेही योगदान हवेच ना..!

### लोकशाही शाळेचा प्रयोगही यशस्वी

स्नेहग्राममध्ये वेगवेगळी पार्श्वभूमी असलेली ४० मुलं ही वयानुरूप प्रवेशित आहेत. चाकोरीबद्ध शिक्षणाला फाटा देत निरनिराळे प्रयोगाद्वारे मुलांना विकसित करण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते. यासाठी चार भिंतीच्या बाहेरचे शिक्षण व शिक्षणातील आधुनिकता यांचा मेळ साधून व्हर्च्युअल क्लास, व्ही. आर. लायब्ररी, टॅब स्कुल, (१००० वृक्ष लागवड व संवर्धनातून उभारलेली ) हिरवी शाळा; तसेच लोकशाही शाळेचा प्रयोगही यशस्वी केला. त्यात प्रामुख्याने स्नेहग्राम पंचायत. सरपंच व इतर सदस्यांसह तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामसभा, ज्युडिशिअल कमिटी, निधी कमिटी निर्माण केल्या.

# स्नेहग्राममध्ये विद्यार्थी ग्रंथालयाचे उदघाटन

**सकाळ वृत्तसेवा**

बार्शी ता.२० : कोरफळे(ता. बार्शी) येथील स्नेहग्राममध्ये वंचित विद्यार्थ्यांसाठी परिवर्तनाच्या वाटा समूहाच्या वतीने उभारलेल्या ग्रंथालयाचे उदघाटन राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमासाठी परभणीचे शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण काळम पाटील, गोदावरी राठोड, दिलीप नेवसे, स्नेहग्रामचे संचालक महेश निंबाळकर,विनया निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मागील बारा वर्षापासून शाळाबाह्य, अनाथ, वंचित विद्यार्थ्यांसाठी काम करणारे महेश निंबाळकर, विनया निंबाळकर यांचा यावेळी डॉ.गोविंद नांदेडे यांच्या हस्ते सत्कार झाला.

यावेळी बोलताना डॉ.गोविंद नांदेडे म्हणाले, महेश आणि विनया



बार्शी : स्नेहग्राम येथे ग्रंथालयाचे उदघाटन करताना परिवर्तनाच्या वाटा समूहचे सदस्य निंबाळकर कुटुंबिय.

यांनी तयार केलेले स्नेहग्राम वंचित, उपेक्षित पालावरच्या विद्यार्थ्यांसाठी आधुनिक काळातील शैक्षणिक तीर्थक्षेत्रच म्हणावे लागेल. येथील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे म्हणजे सीमेवर लढणाऱ्या सैनिकाप्रमाणे सर्वोच्च पातळीवरची देशसेवाच आहे.

विठ्ठल भुसारे म्हणाले की, कोणत्याही परिणामाची चिंता न करता नोकरी सोडून कोणताही पगार न घेता असे कार्य करणे आजच्या जगात दुर्मिळ आहे. त्यागवादी जीवन स्विकारून स्नेहग्राम साकारले आहे.

स्नेहग्रामचे संचालक महेश निंबाळकर म्हणाले की, स्नेहग्रामचा जन्म पालावरच्या शाळेतून झाला. शाळाबाह्य मुले पाहून मन अस्वस्थ होत होते. मुलांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही भावना स्वस्थ बसू देत नव्हती. जिल्हा परिषद शाळेची नोकरी सांभाळून अशा मुलांचा सांभाळ करणे शक्य नव्हते म्हणून आम्ही पूर्ण आयुष्य स्नेहग्रामसाठी समर्पित करण्याचा निर्णय घेतला येथील शाळाबाह्य मुले मोठ्या पदावर जातील तेव्हाच स्नेहग्रामचा विजय होईल.

यावेळी प्रवीण काळम पाटील, प्रभाकर पवार, के.डी.राऊत, डॉ.राम वाघमारे, रमेश चव्हाण, संदीप पवार, विक्रम अडसूळ, नारायण मंगलारम, उमेश खोसे उपस्थित होते. परिवर्तनाचा वाटा समूह सदस्यांचा विशेष स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी नागरिक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## लाभार्थी

आजपर्यंत अजित फाऊंडेशनच्या माध्यमातून स्थलांतरीत व भटक्या समाजातील २२०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन औपचारिक शाळेत प्रवेशित केले. संस्थेचे खालील प्रकल्प व उपक्रम सुरू असून त्याचे लाभार्थी घटक खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रकल्प / उपक्रमाचे नांव | लाभार्थी |
|---|---|---|
| १ | स्नेहग्राम | ४० |
| २ | साकव शाळा | १२० |
| ३ | सृजन शाळा | ७५ |
| ४ | स्लम स्कूल | ११० |
| ५ | प्रॉमिस ऑफ पेन्सिल | १००५ |
| ६ | सोलर नाईट स्कूल | १३० |
| ७ | लाईट लायब्ररी | ११० |
| ८ | प्रोटिन क्लब | ११० |
| ९ | चॅरिटी केअर | १० |
| १० | रिलीफ टु पुअर | १००० |
| ११ | कम्युनिटी हेल्थ प्रोग्राम | ६०० |
| १२ | क्लीन वॉटर प्रोजेक्ट | ५१० |

## स्थावर मालमत्ता-२०२१-२२

| अ.क्र. | तपशील | मूळ किंमत | संस्था खरेदी/देणगी |
|---|---|---|---|
| १ | सायकल (४ नग) | १२००० | देणगी |
| २ | फर्निचर | ८०००० | संस्था खरेदी |
| ३ | टिव्ही | ४१००० | देणगी |
| ४ | कपाट | ६५०० | संस्था खरेदी |
| ५ | कॉम्प्युटर व इतर | ३५००० | देणगी |
| ६ | इले. फिटींग | १२००० | देणगी |
| ७ | शिलाई मशीन | ८५०० | देणगी |
| ८ | पुस्तके | १०००० | देणगी |
| ९ | ग्रंथालय बांधकाम | ११५००० | देणगी |
| १० | खुर्च्या | २२५० | संस्था खरेदी |
| ११ | सोलार लाईट बल्ब | ३००० | संस्था खरेदी |
| १२ | फॅन | ४००० | देणगी |
| १३ | संगीत साहित्य | २०७०० | देणगी |
| १४ | संगणक सॉफ्टवेअर | ३०००० | संस्था खरेदी |
| १५ | इमारत | १५ लाख | देणगी |

अजित फाऊंडेशन

अजित फाऊंडेशन ही नोंदणीकृत अशासकीय संस्था असून ती महाराष्ट्रात कार्य करते. सुधारीत शिक्षणाच्या संधीद्वारे मुलांचे, विशेषत: वंचित व निराधार मुलांचे जीवनमान सुधारण्यासाठी समर्पितपणे कार्य करणारी संस्था आहे.


### अजित फाऊंडेशन

'स्नेहग्राम', मु. पो. कोरफळे, पानगांव रोड,
ता. बार्शी, जि. सोलापूर पिन-४१३४०१ (महाराष्ट्र)

**संपर्क**

: +91 - 9096812860 / 9822897382

: srujanonline@gmail.com

: www.snehgram.in


